**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६**

- उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(ग) खालील अधिसूचना.
- बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३१(३) व विनियम ३३(५) चे उपखंड २.१ (सी) मधील प्रस्तावित फेरबदलास उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(ग)अन्वये मंजूरीबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**दिनांक :- ०४/०३/२०२६**

**शासन निर्णय** : सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( निर्मलकुमार चौधरी )**
**उप सचिव महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री तथा रा.उ.शु मंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
६. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. मा.प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

(१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा.
(३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(४) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्साहटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर मंजूर अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करावयाचे नकाशे ५ प्रतीत शासनास सत्वर सादर करावेत.

(५) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.

( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती १)नगर विकास विभाग नवि-११), मंत्रालय, मुंबई २) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई ३) मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा ४)संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व ५) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)

(६) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
(७) निवड नस्ती (नवि-११).

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

- Notification under section 37 (1AA) (c) of the said Act.
- Sanction to proposed modification in Regulation 31(3) and Sub Clause 2.1 (C) of Regulation 33(5) of the Development Control and Promotion Regulations -2034 of Greater Mumbai.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
Mantralaya, Mumbai 400 032.
Dated :- 04/03/2026.

**NOTIFICATION**

**No.TPB-4325/1585/CR-142/2025/UD-11**

Whereas, the Municipal Corporation of Greater Mumbai is the Planning Authority for the area within its jurisdiction (hereinafter referred to as "the said Corporation") as per the provision of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act");

And Whereas, in exercise of the powers conferred by sub Section (1) of Section 31 of the said Act, the State Government vide Notification No.TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08/05/2018 (hereinafter referred to as "the said Notification") has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai along with the Development Control and Promotion Regulations -2034 for Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Regulations") with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification. And whereas, Government has issued corrigendum of even number dt. 22nd June, 2018; And whereas, thereafter Government has issued a Corrigendum and Addendum of even number dt. 29th June, 2018 to the said Notification, which is published in Government Gazette dt. 30th June, 2018; And whereas, the said Regulations have come into force from 1/09/2018; And whereas, the Government of Maharashtra vide Notification dt. 21/09/2018 has sanctioned EP-1 to EP-168 (Excluding certain EP and provisions which were kept in abeyance) in the said Regulation; And whereas, the Government of Maharashtra vide Notification dt. 12/11/2018 has issued corrigendum in respect of some typographical errors and mistakes and also to clarify and co-relate certain provisions of said Regulations for its proper interpretation;

And Whereas, Regulation 31(3) of the said Regulations stipulates about 'Fungible Compensatory Area' and whereas as per this provision, in case of redevelopment under regulation 33(5), the fungible compensatory area admissible on existing BUA shall be granted without charging premium. Provided further that in case of redevelopment schemes of EWS/ LIG category under Regulation 33(5) where rehab entitlement not exceeding 35 sq.mt, then fungible compensatory area on such rehab entitlement shall be granted without charging premium;

And Whereas, Regulation 33(5) of the said Regulations stipulates about

'Development/Redevelopment of Housing Schemes of Maharashtra Housing & Area Development Authority (MHADA)' and Sub Clause 2.1(C) of Regulation 33(5) stipulate about 'sharing of the balance FSI'. As per this provision, the FSI remaining in balance after providing for the rehabilitation and the incentive components, shall be shared between the Co-operative Housing Society and MHADA in the form of BUA. Provided that, MHADA without insisting MHADA's Share in the form of BUA, may allow additional BUA over and above existing BUA up to 3.00 FSI by charging premium as given in this regulation;

And Whereas, the Vice Chairman & Chief Executive Officer, Maharashtra Housing & Area Development Authority (hereinafter referred to as "MHADA") vide his letter dated 12/12/2023 addressed to the Government in Urban Development Department has requested to make modification in Regulation 31(3) and in Sub Clause 2.1(C) of Regulation 33(5) of the said Regulations so as to make MHADA redevelopment schemes more feasible. It is requested to modify the Regulation 31(3) to allow 'Fungible Compensatory Area' on rehab entitlement as per Regulation 33(5) (2.1) (A) instead of existing BUA and it is further stated that while calculating the additional built up area for redevelopment under Regulation 33(5), instead of deducting the existing built up area from the total permissible built up area, if premium is levied for the remaining additional built up area excluding the built up area of rehab component, it will help in facilitating redevelopment by improving the viability of redevelopment projects;

And whereas, in view of the above said request of MHADA, the Government in Urban Development Department is of the opinion that in the public interest, it is expedient to modify the Regulation 31(3) and Sub Clause 2.1(C) of Regulation 33(5) of the said Regulations;

And whereas, in exercise of the powers conferred under Sub-Section (1AA) of Section 37 of the said Act, Government had issued Notice of even number dated 28th October, 2025 (hereinafter referred to as "the said Notice") for inviting suggestions/objections from the general public with regard to the proposed modification (hereinafter referred to as "the proposed modification") as mentioned in the Schedule appended to the said Notice and appointed the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai as the Officer (hereinafter referred to as "the said Officer") to complete the procedure as stipulated under Section 37(1AA) of the said Act and to submit a Report on the objections / suggestions received in respect of the proposed modification to the Government after giving hearing to the concerned persons;

And whereas, the said Notice dated 28th October, 2025 was published in the Maharashtra Government Gazette (Extra ordinary Part-I) dated 31/10/2025 and the said Officer has submitted his report vide letter Dated 08/01/2026 through the Director of Town Planning, Maharashtra State, after completing the legal procedure stipulated under Section 37(1AA) of the said Act;

And whereas, after considering the Report of the said Officer and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that the proposed modification is required to be sanctioned.

Now, therefore, in exercise of the powers conferred upon it under section 37(1AA)(c) of the said Act, the Government hereby:-

A) Sanctions the proposed modification as described more specifically in the Schedule hereunder.
B) Fixes the date of publication of this Notification in the Official Gazette as the date of coming into force of this modification.
C) Directs the said Corporation that in the Schedule of Modifications sanctioning the said Regulations, after the last entry, the Schedule referred to at (A) above shall be added.

This Notification shall also be published on the Maharashtra Government website- www.maharashtra.gov.in (Acts/ Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**(Amar Patil)**
**Under Secretary to Government**

## SCHEDULE

**Accompaniment to the Government in Urban Development Department Notification No. TPB- 4325/1585/C.R.142/2025/UD-11, dated :- 04/03/2026.**

| Regulation No. | Existing Provision | Sanctioned Provision |
|---|---|---|
| **31(3) Fungible Compensatory Area: -** | In case of redevelopment under regulation 33(5), 33(6) & 33(7)(B) of the Regulation the fungible compensatory area admissible on existing BUA shall be granted without charging premium.<br><br>Provided further that in case of redevelopment schemes of EWS/ LIG category under Regulation 33(5) where rehab entitlement not exceeding 35 sq.mt, then fungible compensatory area on such rehab entitlement shall be granted without charging premium. | In case of redevelopment under regulation ~~33(5),~~ 33(6) & 33(7)(B) of the Regulation the fungible compensatory area admissible on existing BUA shall be granted without charging premium.<br><br>Provided further that in case of redevelopment schemes ~~of EWS/ LIG category~~ under Regulation 33(5) ~~where rehab entitlement not exceeding 35 sq.mt, then~~ fungible compensatory area on ~~such~~ rehab entitlement shall be granted without charging premium. |
| **33(5) sub clause 2.1(c ) Sharing of the Balance FSI: provisio** | Provided that.............. ................................, may allow additional BUA over and above existing BUA up to 3.00 FSI by charging premium at the percentage rate of ASR defined in table C1 below. | Provided that.................. ..........................., may allow additional BUA over and above ~~existing BUA~~ ***Rehab BUA entitlement as per sub clause 2.1A*** up to 3.00 FSI by charging premium at the percentage rate of ASR defined in table C1 below. |

( Amar Patil )
**Under Secretary to Government.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६**

- उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(ग) खालील अधिसूचना.
- बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३१(३) व विनियम ३३(५) चे उपखंड २.१ (सी) मधील प्रस्तावित फेरबदलास उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(ग)अन्वये मंजूरीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**दिनांक :- ०४ /०३/२०२६**

**अधिसूचना**

**क्र. टिपीबी-४३२५/१५८५/प्र.क्र.१४२/२०२५/नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करणेत आलेला आहे.) च्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका त्यांचे अधिकार क्षेत्राकरीता (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका" असा करणेत आलेला आहे.) नियोजन प्राधिकरण आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने अधिसूचना क्र.टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि.८/०५/२०१८ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ (यापुढे याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करणेत आलेला आहे) ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अे मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे. आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस सम क्रमांकाचे शुध्दीपत्रक दि.२२ जून २०१८ रोजी निर्गमित केले आहे; आणि ज्याअर्थी, त्यानंतर उक्त अधिसूचनेस शासनाने समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले असून सदर शुध्दीपत्रक व पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे; आणि ज्याअर्थी, उक्त नियमावली दि.१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे; आणि ज्याअर्थी, शासनाने दि.२१/०९/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे उक्त नियमावलीमधील सारभूत स्वरुपाचे बदल ईपी-१ ते ईपी-१६८ ला (ठराविक ईपी व निर्णयार्थ प्रलंबित ठेवलेल्या ठराविक तरतुदी वगळून) मंजूरी प्रदान केली आहे; आणि ज्याअर्थी, उक्त मंजूरीच्या अधिसूचनेत आणि मंजूर तरतूदीमध्ये टंकलेखनाच्या त्रुटी व चुका तसेच उक्त नियमावलीमधील काही तरतूदींच्या अर्थबोधाची स्पष्टता करुन सुसंगती आणणे या करिता शासनाने

दि.१२/११/२०१८ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीचे विनियम ३१(३) मध्ये 'फंजीबल क्षेत्र' बाबत तरतूद आहे आणि ज्याअर्थी, त्यामध्ये विनियम ३३(५) अंतर्गत पुर्नविकासासाठी विद्यमान बांधिव क्षेत्रावर अनुज्ञेय होणारे फंजीबल क्षेत्र हे अधिमुल्य आकारणीशिवाय मंजूर केले जाईल, अशी तरतूद आहे. तसेच, विनियम ३३(५) अंतर्गत EWS/LIG श्रेणीच्या पुनर्विकास योजनांच्या बाबतीत जिथे पुनर्वसन क्षेत्र (Rehab entitlement) ३५ चौ.मी. पेक्षा जास्त नसेल, तर अशा पुनर्वसन क्षेत्रावरील फंजीबल क्षेत्र अधिमुल्य आकारणीशिवाय मंजूर केले जाईल, अशी तरतूद आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीचे विनियम ३३(५) मध्ये 'महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)' च्या गृहनिर्माण योजनांचा विकास/पुर्नविकास' याबाबत तरतूद असून, विनियम ३३(५) च्या उपखंड २.१(सी) मध्ये 'उर्वरित चटई क्षेत्राचे वाटप' याबद्दल तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार, पुनर्वसन आणि प्रोत्साहानात्मक घटकांसाठी चटई क्षेत्राची तरतूद केल्यानंतर शिल्लक राहिलेले चटई क्षेत्र सहकारी गृहनिर्माण संस्था आणि म्हाडा यांच्यात बांधिव क्षेत्राच्या स्वरूपात वाटला जाईल, अशी तरतूद आहे. तसेच, बांधिव क्षेत्राच्या स्वरूपात म्हाडाचे हिस्स्याचा आग्रह न करता, म्हाडा उक्त नियमावलीतील तरतुदीनुसार अधिमुल्याची आकारणी करून विद्यमान बांधिव क्षेत्राच्या वर ३.०० च.क्षे.नि. पर्यंत अतिरिक्त बांधिव क्षेत्र अनुज्ञेय करू शकते, अशी तरतूद आहे;

आणि ज्याअर्थी, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, 'महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) (यापुढे याचा उल्लेख "म्हाडा" असा करण्यात आला आहे) यांनी शासन नगर विकास विभागास सादर केलेल्या दि.१२/१२/२०२३ रोजीचे पत्राद्वारे म्हाडा वसाहतींचे पुर्नविकास योजना व्यवहार्य होण्याच्या दृष्टिने उक्त नियमावलीचे विनियम ३१(३) व विनियम ३३(५) च्या उपखंड २.१(सी) मध्ये सुधारणा करणेबाबत विनंती केली आहे. सदर पत्रामध्ये, उक्त नियमावलीचे विनियम ३३(५) अंतर्गत पुर्नविकासासाठी विनियम ३१(३) अन्वये अनुज्ञेय होणारे फ़ंजिबल क्षेत्र 'विद्यमान बांधिव क्षेत्राऐवजी' विनियम ३३(५)(२.१)(ए) नुसारचे पुनर्वसन क्षेत्रावर (Rehab entitlement) अनुज्ञेय करणेसंबंधी सुधारणा करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच, उक्त नियमावलीचे विनियम ३३(५) अंतर्गत पुर्नविकासाकरिता अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळाची परिगणना करताना एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळामधून अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ वगळण्याऐवजी पुनर्वसन घटकाचे बांधकाम क्षेत्रफळ वगळून उर्वरित अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळाकरिता अधिमुल्याची आकारणी केल्यास, पुर्नविकास प्रकल्पांची वर्धनक्षमता सुधारून पुर्नविकास सुकर होण्यास मदत होईल, असे म्हाडाचे पत्रात नमूद केले आहे;

आणि ज्याअर्थी, म्हाडाची उक्त विनंती विचारात घेता, उक्त नियमावलीचे विनियम ३१(३) व विनियम ३३(५) च्या उपखंड २.१(सी) मध्ये फ़ेरबदल करणे सार्वजनिक हिताचे दृष्टीने आवश्यक आहे, असे शासन नगर विकास विभागाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन शासनाने दि.२८/१०/२०२५ रोजीची सूचना (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त

सूचना" असा करण्यात आलेला आहे) त्यासोबतचे परिशिष्टामध्ये नमूद प्रस्तावित फेरबदलावर (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आलेला आहे) जनतेकडून हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात आली होती आणि ज्याद्वारे प्रस्तावित फेरबदलाबाबत प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचनांवर संबंधितांना सुनावणी देण्याकरीता तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक) अन्वये विहित केलेली कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांची अधिकारी (यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त अधिकारी" असा करण्यात आला आहे.) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित फेरबदलाची उक्त सूचना दि. २८/१०/२०२५ ही महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण भाग-I) मध्ये ३१/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती आणि उक्त अधिकारी यांनी उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) अन्वये वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन दि.८/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा अहवाल नगर रचना संचालनालयामार्फत शासनाचे अंतिम मंजूरीसाठी सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिकारी यांनी सादर केलेला अहवाल विचारात घेता व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्ला-मसलत केल्यानंतर प्रस्तावित फेरबदल मंजूर करणे जनहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक)(ग) अन्वये प्राप्त अधिकारात आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन शासन याद्वारे :

अ) उक्त प्रस्तावित फेरबदलास खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेप्रमाणे मंजूरी देत आहे.

ब) सदरची अधिसूचना शासकीय राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेचा दिनांक हा उक्त फेरबदल अंमलात आलेचा दिनांक असेल.

क) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उक्त नियमावलीच्या मंजूरी सोबतच्या फेरबदलाचे परिशिष्टामध्ये शेवटच्या नोंदीनंतर खालील परिशिष्ट समाविष्ट करणेचे निर्देश देत आहे.

सदर अधिसूचना महाराष्ट्रशासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदा / नियम ) या वेबसाइटवर देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अमर पाटील )

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# परिशिष्ट

( शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीबी-४३२५ /१५८५/ प्र.क्र.१४२/२०२५/ नवि-११, दिनांक – ०४/०३/२०२६ सोबतचे परिशिष्ट)

| Regulation No. | Existing Provision | Sanctioned Provision |
|---|---|---|
| **31(3) Fungible Compensatory Area: -** | In case of redevelopment under regulation 33(5), 33(6) & 33(7)(B) of the Regulation the fungible compensatory area admissible on existing BUA shall be granted without charging premium.<br><br>Provided further that in case of redevelopment schemes of EWS/ LIG category under Regulation 33(5) where rehab entitlement not exceeding 35 sq.mt, then fungible compensatory area on such rehab entitlement shall be granted without charging premium. | In case of redevelopment under regulation ~~33(5),~~ 33(6) & 33(7)(B) of the Regulation the fungible compensatory area admissible on existing BUA shall be granted without charging premium.<br><br>Provided further that in case of redevelopment schemes ~~of EWS/ LIG category~~ under Regulation 33(5) ~~where rehab entitlement not exceeding 35 sq.mt, then~~ fungible compensatory area on ~~such~~ rehab entitlement shall be granted without charging premium. |
| **33(5) sub clause 2.1(c ) Sharing of the Balance FSI: provisio** | Provided that…………..…………………………., may allow additional BUA over and above existing BUA up to 3.00 FSI by charging premium at the percentage rate of ASR defined in table C1 below. | Provided that……………….………………………., may allow additional BUA over and above ~~existing BUA~~ ***Rehab BUA entitlement as per sub clause 2.1A*** up to 3.00 FSI by charging premium at the percentage rate of ASR defined in table C1 below. |

Patil

( अमर पाटील )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन